# ‘It’s My Choice’......जागतिक महिलादिनानिमित्त

दरवर्षी ८मार्च,’जागतिक महिला दिन’ आला की, कर्तुत्ववान महिलांच्या सत्कारांचे खास कार्यक्रम आयोजित होतात. महिलांचे हक्क, आदर ह्या बद्दल हमखास मते व्यक्त केली जातात. मीही त्यापैकीच एक.ह्या लेखाद्वारे, मी माझ्या आयुष्यात घडलेली एक गोष्ट तुमच्याशी share करत आहे . जी खोलवर मनावर कायमस्वरूपात आठवण कोरून गेली. ह्या गोष्टीमुळे मला जाणवले , प्रत्येक स्त्री स्वतःच्या कुवतीनुसार ‘It’s my choice’ असे जगायचे धाडस व्यक्तिगत आयुष्यात करतच असते .

मी गोष्टीत नावे, स्थळ व काल बदलले आहे.

मी एका अतिशय सुंदर वयस्कर, ७० च्या पुढच्या बाईंकडे त्यांच्या घरच्या interior design च्या कामाकरता काही वर्षांपूर्वी गेले होते. त्यांच्या गळ्यात मंगळसूत्र होते, कपाळावर चंद्रकोरीच्या आणि गोल बुंदयाच्या आकाराच्या टिकलीची design. वयोमानाप्रमाणे चेहऱ्यावर सुरकुत्या पण एक वेगळी चमक. त्यांना मी कशाप्रकारचे काम पाहिजे असे विचारले. बहुतांश वेळा clients थोडं इकडचे तिकडचे बोलत राहतात आणि त्यांना track वर आणायला बराच वेळ जातो. पण ह्या मॅडम लगेचच मुद्यावर आल्या आणि म्हणाल्या, ‘माझे यजमान ५ वर्षांपूर्वी वारले.’ माझ्यातल्या मॉडर्न २१व्या शतकातील भारतीय स्त्रीच्या डोक्यात लगेचच आले अरे मंगळसूत्र आणि कुंकू? खरं तर मी कधीच मंगळसूत्र व कुंकू रोज पारंपरिक रिवाजाप्रमाणे लावत नाही. मी ते माझ्या हौसेने, पेहरावप्रमाणे वा मूड प्रमाणे लावते. तरी हा विचार माझ्या डोक्यात तत्क्षणी आला.

मग मॅडम म्हणाल्या, ’मला हा मद्याचा बार काढून टाकायचा आहे, मला ही कोटटोपी भिंतीवर न ठेवता एक सुंदर stand ज्यावर मी माझ्या hats, Sun coat, पावसाळ्यात छत्री असे काही लावीन. ही सतत हलणारी (Rocking chair) खुर्ची तर फेकूनच द्या. मी जरा विस्मयाने पाहत राहिले. मला एक सुंदर hammock लावून द्या. हा जुना डब्बा TV काढून मी flat स्क्रीन लावणार आहे. बाकी हॉलची सजावट तुम्ही सुचवा. मग बेडरूम मध्ये गेलो. तिथे २ सिंगल beds होते. मॅडम म्हणाल्या. ’काय आहे, हे घोरायचे आणि मीच घोरते असे म्हणायचे म्हणून ह्यांनी ह्याच रूम मध्ये आमचा double बेड काढून २ सिंगल आणि मध्ये side table असे केले. मी म्हटले, अहो तरीही आवाज येणारच तर म्हणाले निदान झोपेत हात लावून कूस बदलायला लावायची कटकट तर बंद होईल. मॅडम म्हणाल्या, मी ह्यांना दुसऱ्या बेडरूम मध्ये तुम्ही किंवा मी शिफ्ट होऊया असे सुचविले तर लगेच उसळून म्हणाले, लोक काय म्हणतील? आशा, मला इतके हसू यायचे, माझ्या दोघी मुली

त्यांच्या कुटुंबासह परदेशात, घरात आम्ही दोघंच, कामवाली सकाळची उन्हं सरली की येणार मग आमच्या बेडरूम मध्ये कोण बाहेरचे डोकावणार होते? पण मी कधीच वाद घातला नाही. तर आता मला परत double बेड करून दे. अगदी मोठा, ऐसपैस, लोळत रात्री उशिरापर्यंत वाचता येईल असा. हल्ली ती बेड मध्ये झोपून वाचता येईल किंवा laptop वर काम करता येईल अशी फोल्डिंग table मिळतात नं? ते मी एक ऑनलाइन मागवीन, मला वाटत ते स्वस्त पडेल नाही?'

मी म्हटलं, 'हो'. मॅडमचा आत्मविश्वास आणि एकंदर चुणूक त्या कॉम्पुटर, इंटरनेट बाबत स्वावलंबी (technosavy) असाव्यात असे संकेत देत होत्या. त्यामुळे, मी तुम्हाला ऑनलाइन कसे मागवायचे ह्याकरता guide करू का? असे म्हणायचे धाडसच झाले नाही.. मग आम्ही दुसऱ्या बेडरूम मध्ये गेलो.

त्या म्हणाल्या, ' इथे study, karaoke music सिस्टिम, एक सिंगल बेड ज्यावर माझी मसाज देणारी बाई जी आठवड्यातून एकदा येते तीला चारी बाजूने फिरून मला मसाज देता आला पाहिजे, एक जिमची सायकल ह्या वस्तू राहिल्या पाहिजेत.' खरंतर त्या रूम मध्ये क्वीन size बेड, wardrobe, एक खुर्ची अश्या वस्तू होत्या. मॅडम म्हणाल्या, 'आशा, काळजी करू नकोस, मी काही तुला ह्या वस्तू मला विकून दे सांगणार नाही मी त्या सर्व OLX वर टाकीन. विकल्या गेल्या तर ठीक नाहीतर सरळ वृद्धाश्रमात दान करुन टाकीन.'

मग आम्ही kitchen मध्ये गेलो. ऐसपैस kitchen होते. तिथेच एक dining टेबल ४ जणांचे, लांब सरळ kitchen platform. मॅडम म्हणाल्या, 'इथे पुष्कळ बदल हवे आहेत. मला शक्य असेल तर island cum ब्रेकफास्ट table, c- shaped platform, वॉशिंग मशीन, dryer, dish washer असे पाहिजे. Double door फ्रिज काढून टाक आणि थ्री door फ्रिज बसवू ज्यात फळे, भाज्या खालच्या ड्रॉवर मध्ये दिलेल्या असतात. Microwave, मिक्सर, OTG पूर्वीच्याच वस्तू पण एक low oil fryer मात्र ठेवू.'

मी सर्व नोट्स बनवल्या. मला वाटलं, झाल्या बहुतेक सर्व सूचना. कारण माझ्या मीटिंग मध्ये एकदा मी त्यांच्या टॉयलेट मध्ये जाऊन आले होते. टॉयलेट खूपच नेटकी, बाथ टब, वॉश बेसिन, शॉवर छानच.

मॅडम म्हणाल्या, 'अग टॉयलेट्स बद्दल राहिलंच की, हे बघ तू ज्या टॉयलेट मध्ये गेली होतीस तिथे काहीच बदल नाहीत, कारण माझ्या नातवंडांनी फोन करून सांगितलंय, आजू बाथ टब काढू नकोस. तर मग त्या कॉमन टॉयलेट मधले वॉशिंग मशीन kitchen मध्ये जाईल आणि तिथे मला dry and

wet area separate करून दे. मुख्य म्हणजे ते Gas Gyser काढून टाक कारण त्याच्यातून shower ला continuous  पाणी येत नाही. बादलीत पाणी काढून अंघोळ मला अजिबात आवडत नाही. Glass cubicle करता आले तर बघ.' सर्व बोलून झाल्यावर त्या म्हणाल्या, "सांग कॉफी की चहा की सरबत की बिअर?"

मी म्हटलं ,"मॅडम"

तर त्या लगेच थांबवून म्हणाल्या , 'आता मॅडम नको, मधुरा म्हण, मला एका मैत्रिणीनी केलेले काम आवडेल, चालेल ना? पण तुला choice  आहे मधुरा की मॅडम, तू ठरव.'

मी म्हटलं, 'coffee चालेल.'

त्या म्हणाल्या, 'बघ, मी cheese  sandwich  आणि चिकन मेयो sandwich  अगदी Marzorine style  बनवले आहेत, खाशील? तुझी इच्छा.'

मी वेळेचा विचार न करता होच म्हटल. आम्ही kitchen मधल्या dining table वर स्थावर झालो. त्यांनी प्रत्येक कपमध्ये कॉफी खलून, गरम गरम दोन कप coffee with dash of cinnamon but with  my  permission  बनवली.

पुन्हा त्या बोलू लागल्या,' काही गोष्टी स्पष्ट करते, मला bar counter  नको, कारण मला यजमानांमुळे, आवडत नसून मद्यपान करायची सवय लागली. त्यांची जोशीबाई म्हणून मैत्रीण होती, अतिशय सुंदर, ठसठशीत features, नाजूक बांधा, नेहमी बिनबाहयांचा ब्लाउज, कॉटन साड्या. काही वर्षांनी चुणीदार, पॅन्ट-शर्टही त्या घालायला लागल्या. सर्व पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून scotch घ्यायच्या आणि रंमी खेळायच्या. माझ्या यजमानांनी जोशीबाईंचा दाखला देऊनच, मला मद्यपानाची सवय लावली. शर्ट - पॅन्ट घालायला लावून ball dance करायला लावला. तो करताना मी आणि खरं तर, जास्त हेच फार जोकर दिसायचो. मला उत्तम ब्रिज खेळता येतो आणि मी भरतनाट्यम शिकले होते. पण ह्यांचे घुंगुरु लावून घरात नाचायाचे नसते असे विचार होते. बाकी सर्व गोष्टीत मला सर्वच स्वातंत्र्य होते. आता मी कुंकू लावते आणि मंगळसूत्र घालते कारण माझे features असे आहेत की मी हे केले नाही तर अगदी विधवा दिसते. खरं आहे ते, माझे अगदीच मराठमोळे रूप आहे. मॉडर्न नाही. हेसुद्धा असच म्हणायचे' एका दमात सगळ बोलून त्यांनी एक उसासा टाकला.

कॉफीच्या रिकाम्या कपाकडे बघत त्या म्हणाल्या, 'दोन्ही मुलींच्या बाबतीत मात्र सगळं वेगळं. मुलगा

झाला नाही ह्याची रुख रुख मनात होती ह्यांच्या, पण मुलींना संपूर्ण स्वातंत्र्य देऊन वाढविले. त्यांच्या choice ने लग्नं झाली. त्यांना एकदाही अनाहूत सल्ले दिले नाहीत. दोघी त्यांच्याकडे अमेरिकेला कायमचे ये, म्हणून आग्रह करतात. पण मीच खूप विचारांती ठरवले की जरा वेगळा विचार करावा. स्वतःकरता जगायचे वगैरे म्हणणार नाही कारण जे जगत होते तो माझाच चॉईस होता. मी architect बापाची मुलगी, home science degree घेतलेली, ओळखीच्या मुलाशी लग्न केले. सहवासाने प्रेम झाले. त्यांनी आणि मी एकमेकांचा आदर केला ही सर्वात मोठी जमेची बाजू. आदरापोटी तडजोडी केल्या. त्यांची बाजूही असेल पण ते आता ह्या जगात नाहीत. मग मी ठरवले आता सोबत सुटली आणि आठवणी उरल्यात. मग थोडं वेगळं बेफिकीर जगून पाहावे. म्हणून सर्वप्रथम ज्या आठवणी खोलवर व्रण उमटूवून गेल्या आहेत त्या जिवंतपणी नष्ट करायच्या. आमचा मंगलदास रोडला बंगला होता. १० वर्षपूर्वी ह्यांनी ठरवलं ते किंवा मी कुणीही आधी गेले तर बंगला व त्याची निगराणी जमणार नाही. मुली कधीच भारतात परतणार नाहीत. मग बंगला विकून सरळ हा boat club रोडवर फ्लॅट घेतला. व्यवसाय विकून टाकला. बहुतेक व्यवसाय ह्यांचा ऑक्सिजन होता. कारण त्यानंतर ५ वर्षांतच हे गेले. '

त्या थांबल्या. खूप वेळ एक शांतता होती. मी चोरुनच त्यांच्या डोळ्यांकडे पाहिले. उगाचच मनात होते, madamचे डोळे पाणावले असतील पण नाही त्या अगदी शांत, मनातले बोलल्याचे समाधान दिसत होते. फ्रीजकडे जात म्हणाल्या, 'cold coffee घेऊ आता. आपली गरम coffee पिऊन बराच वेळ झाला पण आशा, choice is yours.'

मी म्हटलं, 'मधुरा, चालेल cold coffee',

ती हसली म्हणाली, 'Thanks, my Friend, मग लवकर सुरू कर काम' .

नंतर काम पूर्ण झाले. पडदे, सोफा कापड, दिवे सर्व गोष्टींना आम्ही बरोबर फिरलो आणि मधुरा touch ने घर सजवले आणि मला Boat Club रोडवर नवीन मैत्रीण मिळाली. नंतर कितीतरी वेळा तिच्याकडे chicken mayo sandwitch with cold coffee घेतलीं. तिच्या मुलींना एकदाच भेटले . मधुरा माझ्याकडे दोनदाच आली. Dorabjee ला शॉपिंगला आणि Mac'D ला coffee प्यायलाही आम्ही भेटलो. आम्हाला Mac'D ची cold coffee खूप आवडायची. गेल्यावर्षी अल्पशा आजाराने ती गेली, दिवस ८ मार्च. तिनी मला नेमका आदल्या दिवशी फोन केला होता, मला बोलता बोलता अगदी सहज विचारले, 'आशा, तू आपली मैत्री तुझ्या choice ने accept केली होतीस ना?'

मी म्हटले, 'अर्थात, तसे नसते तर मी तुला स्पष्ट सांगितले असते. तसे माझ्या वागणुकीतून तूला

दिसलेही असते. मधुरा, तुझ्यामुळे मला समजले, प्रत्येक स्त्री खरतर स्वतःच्या choice नेच जगत असते. पण उगाचच दरवर्षी ८ मार्चला जागी होते आणि स्वतःच्या हक्कांबद्दल दिवसभर बोलते' आम्ही दोघी खूप हसलो. दुसऱ्या दिवशी ८ मार्चच होता, सकाळी फोन आला, "मधुरा जग सोडून गेली."

मला आयुष्यभराचा मोलाचा संदेश देऊन, " Do it only if it's your choice.' मी माझ्या छोट्याशा बागेत मधुराच्या नावाने एक पांढऱ्या चाफ्याचे झाड लावले. त्याला नेहमीच भरभरून फुले येतात आणि परिसरात मधुर घमघमाट पसरलेला असतो. असे मी केले कारण, It's my choice.

**आशा अग्निहोत्री**